मंगळवार, दि. १६ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

# मराठ्यांनंतर बंजारा हुंकार

## मोर्चाच्या लाटेने जालन्यात ‘जय सेवालाल’ची गुंज; एसटी प्रवर्गाची मागणी उफाळून आली

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यात आज अखिल भारतीय बंजारा आरक्षण समितीच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोठा मोर्चा निघाला. या मोर्चातून बंजारा समाजाने अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात तात्काळ समावेश करण्याची मागणी सरकारसमोर ठामपणे मांडली.

सध्या बंजारा समाज व्हीजेएनटी (ए) प्रवर्गात आहे. या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मर्यादित असल्याने समाजातील विद्यार्थ्यांना व तरुणांना शैक्षणिक आणि नोकरीच्या संधींमध्ये अपेक्षित लाभ मिळत नाही. दुसरीकडे, हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख आदिवासी म्हणून आढळतो. ही ऐतिहासिक नोंद समाजासाठी आधारस्तंभ ठरू शकते. शासनाने मराठा समाजाला कुणबी म्हणून ओळख देण्यासाठी हैदराबाद गॅझेटियरनुसार निर्णय घेतला आहे, याच उदाहरणावरून बंजारा समाजालाही एसटी प्रवर्गातील आरक्षण देण्यात यावे, अशी त्यांची मागणी आहे.

बंजारा समाजाची संख्या राज्यात लक्षणीय आहे. आरक्षणाच्या या मागणीमुळे सामाजिक समीकरणे आणि राजकीय गणिते बदलण्याची शक्यता आहे. मराठा समाजाचे आंदोलन, कुणबी प्रमाणपत्राचा प्रश्न आणि आता बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गातील समावेश - या सर्व मागण्या सरकारसमोर मोठे आव्हान निर्माण करत आहेत. सरकारने जर या मागणीकडे सकारात्मक भूमिका घेतली तर समाजाची नाराजी कमी होईल, पण यामुळे इतर मागासवर्गीय प्रवर्गात अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विविध पक्ष या मागणीवर आपली भूमिका ठरवतील. काही पक्ष समाजाच्या पाठीशी उभे राहतील, तर काही पक्ष या निर्णयामुळे निर्माण होणाऱ्या तणावाकडे लक्ष वेधून शासनावर दबाव टाकतील.



**आंदोलनाची तीव्रता**

जालना येथील मोर्चा हा बंजारा समाजाच्या दशकांपासून सुरू असलेल्या लढ्याचा नवीन टप्पा आहे. इतिहासातील गॅझेटमधील नोंदी, सध्याची सामाजिक स्थिती व मर्यादित आरक्षणाचे वास्तव यामुळे या मागणीला आता अधिक वजन मिळाले आहे. शासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास पुढील काळात मोठा सामाजिक असंतोष पेट घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**सरकारसमोर दोन मोठी आव्हाने आहेत** : एसटी प्रवर्गात समावेश करण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी आणि संवैधानिक प्रक्रिया महत्त्वाची आहे. केवळ राज्य शासनाचा निर्णय पुरेसा नाही. इतर प्रवर्गांचा विरोध आणि आरक्षण मर्यादेवरील न्यायालयीन बंधने यामुळे निर्णय गुंतागुंतीचा ठरू शकतो. तथापि, मराठा समाजाला कुणबी म्हणून प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा केल्यानंतर, बंजारा समाजालाही तोच तर्क लावण्याची संधी मिळाली आहे. जालना येथील मोर्चा हा केवळ एक आंदोलन नसून भविष्यातील सामाजिक व राजकीय समीकरणांवर दूरगामी परिणाम करणारा संकेत आहे. बंजारा समाजाच्या मागणीला आता अधिक गती मिळाली असून, शासनाने याकडे दुर्लक्ष केले तर येत्या काळात मोठे सामाजिक असंतोष पेट घेऊ शकतो.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी**

बंजारा समाज ऐतिहासिकदृष्ट्या भटकंती करणारा व्यापारी समाज म्हणून ओळखला जातो. पूर्वी हे लोक बैलगाड्यांच्या ताफ्यातून धान्य, मीठ, कापड यांची वाहतूक करत. त्यामुळे त्यांना लॅम्बाडी, गोर बंजारा किंवा नायक अशा नावांनीही ओळखले जाते. निजाम शाही काळातील हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाचा उल्लेख आदिवासी प्रवर्गात झाल्याचे स्पष्ट संदर्भ आहेत. ही नोंद समाजाच्या सध्याच्या मागणीला कायदेशीर व ऐतिहासिक आधार देते. आरक्षणासाठी बंजारा समाजाने मागील काही दशकांत अनेक आंदोलने केली आहेत. मात्र त्यांना अद्याप व्हीजेएनटी (ए) या मर्यादित प्रवर्गातच स्थान मिळाले आहे.

# केंद्र सरकारने जीएसटी मध्ये बदल केल्यामुळे सर्वसामान्य नागरीकांना दिलासा

## भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे

**जालना । प्रतिनिधी** - पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार मधील अर्थ मंत्रालयाने जीएसटी मध्ये बदल करुन सर्वसामान्य नागरीकांना दिलासा देण्याचे काम केल्याचे मत भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे यांनी सोमवार दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय,जालना येथे आयोजीत पत्रकार परिषद मध्ये केले.

यावेळी पत्रकार परिषदेमध्ये बोलतांना आ.कुचे म्हणाले की, केंद्र सरकारने दैनंदिन घरगुती व शेतीच्या वस्तु वरील जीएसटी दर कमी करुन तसेच अन्नपदार्थ व आरोग्य व विमा घरगुती खर्च कमी होणेसाबण, शैम्पू, टूथपेस्ट इत्यादी वस्तू स्वस्त होतील. जे लोक दररोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हे उत्पादने घेतात आरोग्य विमा कमी करारहित / कमी ऋद्ध दर मिळण्याने महागपणा कमी होईल. गृहघटांची /इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त होणेटीव्ही, एसी, छोटे लहान गाड्या व २-व्हीलर्सवर कमी कर लागणार असल्यामुळे त्यांची किंमत कमी होईल असेही आ.नारायणराव कुचे म्हणाले.




त्यांना बचत होईल. तसेच अन्नपदार्थ आणि आरोग्यब्रेड, दूध, पनीर इत्यादी मूलभूत अन्नपदार्थांवर ऋद्ध कमी किंवा शून्य होईल अन्नाची किंमत कमी होण्याची होणार आहे. याशिवाय जीवन विमा व उपकरणे यांवर आधीपेक्षा कमी कर लागणार असल्यामुळे उत्पादनांची किंमत कमी होईल जेव्हा मार्केटमध्ये मागणी वाढू शकते आणि स्वस्त पर्याय उपलब्ध होतील. गाड्या / वाहन खरेदी स्वस्त होणे

यावेळी भाजपा जालना महानगर अध्यक्ष भास्करराव दानवे म्हणाले की, केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी अनेक योजना आहेत त्या योजनेचा सर्वसामान्य जनतेने लाभ घ्यावा व केंद्र सरकारने जीएसटीमध्ये अनेक बदल केल्यामुळे त्यामध्ये नवीन वाहन घेण्याचा खर्च कमी होण्याची अपेक्षा आहे तसेच शेती व कृषी खर्च कमी होणे ट्रॅक्टर, उपकरणे, सिंचन यंत्रणा, टायर्स यांसारख्या कृषी-उत्पादनाच्या बाबतीत खर्च कमी होणार म्हणजे शेतकऱ्यांचा उत्पन्न भाग वाढू शकतो. मध्यम-वर्ग व कमी उत्पन्न गटांवरील ताण कमी करणे जे लोक हलक्या बजेटमध्ये राहतात, त्यांचे खर्च फारसा कर वाढीस कारणीभूत बनायचा नाही, या सुधारणांमुळे त्यांच्या जीवनमानात सुधारणा होईल. व्यवसायांवरही प्रभाव छोटे व्यापारी, चड्वणी यांना कर व्यवस्थापन सुलभ होईल; कमीत कमी दरांमुळे उत्पादन खर्च कमी

पान २ वर

# राजे मल्हार नगर परतूर येथे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा नागरी सत्कार



**परतुर । प्रतिनिधी** - परतुर शहरातील राजे मल्हार नगर येथे माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांनी अवतार मेहेर बाबा आध्यात्मिक केंद्र येथे सभा मंडप (डोम शेड) बांधकाम करिता विशेष प्रयत्न करून सभामंडप (डोम शेड ) शासनाकडून मंजूर करून सदरील बांधकाम पूर्ण करून दिल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल यांचा नागरी सत्काराचे आयोजन दि.१२/०९/२०२५ रोजी केले होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल सह उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, ओबीसी जिल्हाप्रमुख शिवाजीराव तरवटे, परतूर शहर प्रमुख दीपक हिवाळे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सुभाषराव पिसाळ ,राणोजी गोरे, अनिल गोरे ,बाळू राऊत, बाळू लाळे, अनिल मुळे ,गणेश गोरे, सुरेश पिसाळ, काशिनाथ लबासे,बालासाहेब राऊतसह राजे मल्हार परिसरातील महिलांची मोठ्या प्रमाणात विशेष उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजे मल्हार नगर मधील युवकांनी व अवतार मेहेरबाबा आध्यात्मिक केंद्रातील सदस्याने विशेष परिश्रम घेतले.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या दौऱ्यासाठी शिवसेनेची आज नियोजन बैठक

**जालना । प्रतिनिधी** - शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गुरुवारी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर कार्यकर्ता मेळाव्यासाठी येत असून नियोजनासाठी शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक मंगळवारी ( ता.१६) सकाळी ११.०० वा.भाग्यनगर परिसरातील आ.अर्जुनराव खोतकर यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिली. आ.अर्जुनराव खोतकर, आणि आ. हिकमत उढाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीस शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात शिवसेनेचे संघटन बळकत करण्याच्या दृष्टिकोनातून आणि संघटनेला उभारी देण्याकरिता उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. असे सांगून नियोजन बैठकीस जिल्हा परिषद, पंचायत समिती ,बाजार समिती,नगर पालिका, नगर पंचायती, ग्रामपंचायतींचे आजी- माजी पदाधिकारी, सदस्य ,शिवसेना, युवासेना, दलित आघाडी, महिला आघाडी,किसान सेना, अल्पसंख्यांक सेनेचे जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, शहर संघटक, उपशहर प्रमुख, विभाग प्रमुख, उपविभाग प्रमुख तसेच अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. पाटील बोराडे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, डॉ. आत्मानंद भक्त यांनी केले आहे.

## कामचुकार अधिकाऱ्यांचा घेतला समाचार;‘दिशा’ समितीची आढावा बैठक संपन्न

# जिल्ह्यातील विकासाची कामे तात्काळ पार पाडावी - खासदार डॉ. काळे

**जालना । प्रतिनिधी** - जल जीवन मिशन, महावितरण, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध योजनेंतर्गत मंजूर असलेली लोकहिताची विकास कामे वेळेत पार पाडावीत, अशा सूचना जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिल्या.

जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज आयोजित जिल्हा समन्वय व सनियंत्रण समिती म्हणजेच 'दिशा' समितीच्या आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ. काळे बोलत होते. बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आमदार नारायण कुचे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., अपर जिल्हाधिकारी रिता मैवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती.

लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ.काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच




कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. अशी सुचनाही खासदार डॉ.काळे यांनी केली.

बैठकीत समितीचे अध्यक्ष डॉ. काळे यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना,राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री कृषी

पान २ वर

## संपादकीय

# मराठी साहित्यातील अनमोल रत्न

निसर्ग कवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना धो महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेड येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असे. ना धो महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. ना धो हे त्यात सर्वात थोरले. त्यांचे प्राथमिक शाळेत गावातच झाले मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करत. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार, निसर्ग यांची आवड होती त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली. मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगांवला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शकत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्य प्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्य प्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिति हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले पण कविता थांबली नाही. ते शेत शिवारात रमून कविता करू लागले. शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद - लईंनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना धो महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्य लेखनही सुरू ठेवले. गांधारी ही कादंबरी, गपसप व गावाकडच्या गोष्टी या लोककथा संग्रह, यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु ल. ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्य लेखन विपुल प्रमाणात केले असले तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होतं. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत. जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत. ना धो महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्ग कवी सर्वांना सोडून गेला. ना धो महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्ग कवी ना धो महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## वाचकांचे मनोगत

### सार्वजनिक गणेशोत्सव लोकमान्य टिळकांचा हेतू...

इंग्रज राजवटीत भारत स्वतंत्र करण्याच्या कामी लढा सुरू असताना भारतीय नेत्यांवर इंग्रजांची करडी नजर होती.अशाही परिस्थितीत लोकमान्य टिळकांनी त्यावर मात करुन भारतीय नागरिकांना सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करून आपला हेतू साध्य केला.भारत स्वतंत्र झाला.सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाला. पुढे मात्र सार्वजनिक गणेशोत्सवाचा हेतू मागे पडून ' गणेशोत्सवाला ' उत्पन्न वाढीचे स्वरूप प्राप्त झाले. धार्मिक ताळतंत्र बिघडले.गणेशोत्सव मंडळे ,त्यांचे पदाधिकारी आपला गणपतीला दर्शनासाठी मोठ्या रांगा कशा लागतील यांत गुंतले. समाजप्रबोधन राहीले बाजुला.आता तर गणेशोत्सवात महानगरपालिका, शासन शिस्तीत गणेशोत्सव पार पाडावा म्हणून निर्बंध घालतात पण त्याचे पालन होत नाही.गणपती विसर्जन मिरवणूका वेळेत संपवावा,डीजे - लेझरचा वापर करु नये,नाचताना असभ्य गाणी,अंगविक्षेप करु नयेत अशा सूचना करूनही शेवटी व्हायचे तेच झाले.चंद्रग्रहन सुरू झालं ,तरी विसर्जन राहिलं होत.लेझर - ध्वनी प्रदूषणामुळे पुण्यात ४० गणेशोत्सव मंडळांवर कारवाई करावी लागली.लालबागचा राजा विसर्जन करण्यास ३३ तास लागले.कृत्रिम तलावात विसर्जन केलेल्या मूर्तींची डंप्पर वरून क्षेपणभूमीकडे रवानगी झाली.कार्यकर्ते कधीतरी लोकमान्य टिळकांचा हेतू साध्य करतील की नाही ? बुद्धीचीदेवता गणराया सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणार्या कार्यकर्त्यांना चांगली बुद्धी दे एवढीच मागणी तुझ्या चरणी.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

# ना. छगन भुजबळ यांच्याशी चर्चेची तयारी!

होय! भुजबळ साहेब मराठा आणि कुणबी व एकंदरच आरक्षण व राजकीय उद्दिष्ट पुर्तूतेसाठी पेटवली जात असलेली सामाजिक विखारी कटुता या संदर्भात एका बाजूचे कडवट सर्वोच्च नेते म्हणून आणि आपल्या लातूर दौऱ्यातील जाहीर आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी आम्ही मराठा आणि बहुजन समाजात कार्यरत विविध सामाजिक संघटनेचे सक्रिय पदाधिकारी आपल्याशी चर्चा करण्यासाठी तयार आहोत.

चर्चेसाठी वेळ आणि स्थळ आपण तातडीने कळवावे.! असे आवाहन सकळ मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक आणि अभ्यासक डॉ. संजय लाखेपाटील यांनी ना. छगन भुजबळ यांच्या कालच्या लातूर जिल्हा दौऱ्यावर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देताना केले असून, पुढे बोलतांना डॉ. संजय लाखेपाटील यांनी राज्यातील मराठा समाजाला आर्थिक मागासासाठीचे ५०% पुढील १०% आरक्षणाचा लाभ सध्या मिळत नाही; घेताच येत नाही (कारण न मागीतलेले एसईबीसी आरक्षण) तसेच देशातील प्रस्थापित कायदा, राष्ट्रीय /राज्य मागासवर्गीय आयोगाचे विविध अहवाल व सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निवाड्यानुसार मराठा व कुणबी (कुणबीमराठा, मराठा_कुणबी) या वेगवेगळ्या व स्वतंत्र जाती आहेत याची माहिती आपणास नसावी याबद्दल सखेद आश्चर्य व्यक्त केले आहे!तसेच देशातील प्रस्थापित कायद्या नुसार कोणत्याही व्यक्तीला ला जातीला किंवा जात समुहाला दोन आरक्षण कायद्याचा लाभ घेता येत नाही; नव्हे तसे दोन कायदे लागूच नसतात याचीही माहिति आपणास नाही हे कालच्या (ना. भुजबळ) यांच्या व्यक्तव्यावरून स्पष्ट झाले असल्यामुळे याबाबत डॉ. लाखेपाटील यांनी गंभीर चिंता व्यक्त केली असून अश्या घटनात्मक, कायदेशीर अज्ञानातूनच्या व्यक्तव्यावरूनच राज्यातील सामाजिक वातावरण गढूळ होत असल्याने जेष्ठ नेते ना. छगनराव भुजबळ यांना योग्य वैधानिक सल्ल्याची गरज असल्याचे आग्रही प्रतिपादन केले आहे. नसता मराठा समाज कुणबी, एसईबीसी, ईडब्लूएस अश्या विविध आरक्षणाचा लाभ मराठा जात घेत आहे असे धांदात खोटे व्यक्तव त्यांनी केलेच नसते असे निदर्शनास आणून देऊन ही वैधानिक वास्तविकता समजून घेण्यासाठी/समजून सांगण्यासाठी ना. छगन भुजबळ यांच्याशी विशेष चर्चेची तयारीही डॉ. संजय लाखेपाटील यांनी दाखवली आहे आणि त्यांनी किमान ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. बबनराव तायवाडे यांना ओबीसी आरक्षण विषयक वैध तरतुदीचे शासकीय सल्लागार म्हणून मंत्रीमंडळाच्या ओबीसी आरक्षण विषयक उपसमितीने नियुक्त करावे अशी आग्रही विनंती डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली असून राज्यात मराठा समाजाने न मागितलेले आणि कायद्याच्या, घटनेच्या, सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांच्या कसौटीवर न टिकणारे आणि तसे देण्याचा राज्याला वैधानिक अधिकारच नसलेले आणि म्हणूनच मराठा समाजाला नको असलेले ५०% पुढील एसइबीसी आरक्षण कायदा रद्द करण्यासाठी व त्यामुळे आपोआपच लागू होऊ शकणारे आर्थिक मागासासाठीचे ईएसडब्लू आरक्षण तातडीने परत लागू करण्यासाठी ना. छगन भुजबळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे व ना. अजित पवार यांच्या कडे मध्यस्थी करावी अशीही आग्रही मागणी केली असून, पुढे बोलतांना काही माफक अपेक्षा व्यक्त केल्या असून ना. छगन भुजबळ यांनी श्री. बबनराव तायवाडे यांचा सल्ला घेतल्याशिवाय मराठा व कुणबी जातीच्या स्वतंत्र आरक्षणाबाबत वैधानिक अज्ञानातूनत्या एकच जाती आहेत असा अपप्रचार करू नये; १९६७ च्या कायद्याचे तंतोतंत पालन करून ओबीसी आरक्षण विषयक



मंत्रीमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष आणि राज्याचे महसूल मंत्री ना चंद्रशेखर बावनकुळे यांच्या महसूल/प्रशासन यंत्रणेद्वारे कायदेशीर वैधता तपासून दिल्या जात असलेल्या ओबीसी जातसमुहातील क्र ८३ वरील कुणबी जात प्रमाणपत्रांना सामाजिक गैरसमज वाढवून संघर्ष व विरोध करू नये; ओबीसी जातसमुहातील कुणबी जातप्रमाणपत्रासाठी आग्रही आंदोलक नेते श्रीमान मनोज जरांगे आणि आपल्यातील राज्यातील सामाजिक प्रदुषण वाढवून युवकांमध्ये नैराश्य व आत्महत्या प्रवृत्ती वाढवणारा टीआरपीसाठीचा 'डब्लुडब्लूएफ' कलगीतुरा तातडीने थांबवावा आणि राज्यातील निकोप व गंभीर विषयांच्या चर्चेसाठी स्पेस सोडावी अशी आग्रही विनंती केली असून ओपन मधील मराठा जातीला सध्या दिलेले परंतु बेकायदेशीर, घटनाबाह्य ५०% पुढचे एसईबीसी आरक्षणाचा कायदा ताबडतोब रद्द करून, मुंबई उच्च न्यायालयाला तसे कळवून संबंधित याचिका राज्य सरकारने परत घ्यावी आणि त्यामुळे राज्यातील खुल्या गटातील मराठा जातीसाठी आर्थिक मागासासाठीचे ईएसडब्लू आरक्षण आपोआप लागू होण्यासाठी मराठा जातीतील राज्यातील आमच्या विविध प्रमुख मराठा सामाजीक संघटना /पदाधिकारी यांच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करावे आणि या चर्चांसाठी शिष्टमंडळाने आपणास भेटण्यासाठी तातडीने वेळ द्यावा अशीही आग्रही विनंती डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली असून तशी विनंती त्यांच्या कार्यालयात संबंधित सहायकांनी नोंदवली आहे!

**डॉ. संजय लाखे पाटील,**
**राज्य समन्वयक, सकळ मराठा समाज आणि मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र**
Email - slakhepatilgmail.com
Cell - ९४२२२१५२७८, ९८१९५२०००२

# एकेकाळी माणसात असणारी मानवता का लोप पावली?

हल्ली मी पंचवीस वर्ष वयात पदार्पण केले आहे. म्हणजे माझे चालते वय पंचवीस वर्षे आहे. एवढ्या पंचवीस वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीत म्हणजेच बालपणापासून ते आजतागायत मी समाजात व गावात वावरत असताना, सामाजिक, धार्मिक सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील विविध प्रकारच्या नमुनेदार माणसांचा अभ्यास करत आलो आहे. लहानाचा मोठा होत असताना वेगवेगळ्या नमुन्याची माणसे ओळखत जाऊ लागलो. विविध क्षेत्रातील वेगवेगळ्या माणसांच्या संपर्कात आल्याने त्यांच्या चांगल्या व वाईट गुणांचा अनुभव येऊ लागला. त्यांच्या वागणुकीचे बारकाईने निरीक्षण केल्यास मला असे दिसून येत आहे की, एकेकाळी माणसात असणारी माणुसकी लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात वावरत असताना मला अनेक नमुन्याची रंगतदार माणसे भेटत गेली आणि त्या भेटलेल्या नमुनेदार माणसांचा मी बारकाईने अभ्यास करत आलो आहे. मी आजपर्यंत पाहिलेली व अनुभवलेली माणसे आणि त्या माणसांची सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रातील असणारी एकमेकांबद्दल अमानुष वागणूक यांचे सूक्ष्म निरीक्षण माझ्यासह आपण सर्वांनी केले आहे. तरीसुद्धा मी कालच्या आणि आजच्या माणसांमध्ये असणारी मानवता स्पष्ट करणार आहे. एकेकाळी माणसांमध्ये, भावंडांमध्ये, मित्रांमध्ये, पती-पत्नीमध्ये, आजी आजोबांमध्ये, बापलेकांमध्ये आणि समाज बांधवांमध्ये एकमेकांबद्दल असलेली आदरयुक्त भावना आणि त्यांच्यात असलेली मानवता, प्रेम, माया, आपुलकी व जिव्हाळा पूर्वीच्या तुलनेत आता लोप पावत चालला आहे. एकमेकांना जीव लावणारी, एकमेकांच्या अडीअडचणीत धावून जाणारी, गरजू , दुखी व पिडीत लोकांना मायेचा व ममतेचा आधार देणारी मानवतावादी व मायाळू माणसे आता दुर्मिळ झाली आहेत आणि स्वार्थी, मतलबी, धूर्त, कपटी व भ्रष्ट माणसांचा वावर जिकडे तिकडे गल्लीपासून दिल्लीपर्यंत प्रचंड प्रमाणात वाढला आहे. आजकालचा माणूस फक्त स्वतःचा व स्वतःच्या घर परिवाराचा विचार करत आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि माणुसकीच्या नात्याने समाज बांधवांना गरजेनुसार मदत करणे हे मानवतेचे लक्षण व कर्तव्य आहे. गोरगरीब व तळागाळातील मुलींच्या लग्नाला आर्थिक मदत करणे, त्यांच्या दुःखद प्रसंगात सामील होणे, संकट काळात मदतीचा हात देणे आणि माणुसकीच्या नात्याने त्यांना ख्यालीखुशाली विचारणे हे प्रत्येक माणसाचे माणुसकीच्या नात्याने मदत करणे व त्यांना मायेची सावली देणे त्यांचे परम कर्तव्य आहे. पण एकेकाळी माणसात असणारी मानवता आता लोप पावली आहे आणि माणुसकी हिन, चारित्र्यहीन, निर्दयी व स्वार्थी लोकांचा सुळसुळाट खूप वाढला आहे. प्रत्येकजण स्वतःचा विचार करून जगत आहे. स्वतःच्या आई-वडिलांना, बहिण भावांना, वृद्ध आजी आजोबांना मानवतेची वागणूक न देता त्यांना सैतानाच्या व दानवाच्या नजरेने पाहत आहेत. सख्ख्या भावंडांमध्ये, माय लेकरांमध्ये, आजी नातवंडांमध्ये आणि प्रत्येक रक्ताच्या नात्यांमध्ये दया, माया, करुणा व प्रेमभाव नष्ट होऊन त्यांच्यात राक्षस जागा झाला आहे. म्हणूनच सख्ख्या भावांमध्ये शेतीच्या वाटणीवरून व घराच्या वाटणीवरून जोराचे भांडण सुरू होत आहे. गुंठाभर जमीन सख्खा भाऊ आपल्या भावाला मोठ्या मनाने सोडायला तयार नाही. विशेष करून नोकरदार भाऊ आपल्या शेतकरी भावाला शेती व घराचा हिस्सा सोडायला तयार नाही. सख्खे भाऊ संपत्तीच्या हव्यासापोटी लाठ्या काठ्या व भालाबरची घेऊन एकमेकांना हाणामारी करताना दिसत आहेत. पत्नीचे ऐकूण सख्या भावाला व आई वडिलांना दूर केले जात आहे. एकत्र कुटुंब पद्धतीचे विभक्त कुटुंब पद्धतीत रूपांतर होत आहे. आज कालच्या मुलांना आई-वडील ओझे वाटत आहेत. म्हणूनच स्वतःच्या आई-वडिलांना वृद्धाश्रमाचा रस्ता दाखवत आहेत. म्हणजे आजकालच्या पिढीमध्ये माणुसकी जराही जिवंत राहिली नाही. एकेकाळी माणसात असणारी मानवता लयाला जाऊन माणूस राक्षस व दानव बनला आहे. आणि नको ते दुष्कृत्य व माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य करून माणुसकीला कलंकित करत आहे. एकेकाळी माणसांमध्ये मानवता ठासून भरली होती. माणूस सगळ्यांशी प्रेमाने, मायेने व आपुलकीने वागायचा. एकमेकांच्या चांगल्या व वाईट काळात धावून जायचा. तेव्हाचा माणूस चारित्र्यवान व शीलवान होता, आपल्या शिलाला प्राणपणाने जपायचा. स्त्रिया व आयाबायांकडे वाईट नजरेने बघण्याचा त्याचा दृष्टिकोन नेक होता. सार्वजनिक ठिकाणी एखाद्यावर अन्याय वा अत्याचार होत असेल तर तेव्हाच्या माणसातील माणुसकी जागी व्हायची आणि त्यांना माणुसकीच्या नात्याने मदत केली जायची. समाजातील एखादी व्यक्ती मरण पावली तर अख्खा समाज किंवा गाव मातीला जमायचा आणि जड अंतःकरणातून त्या मृत व्यक्तीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करायचे. सगळ्यांचे डोळे पानावले जायचे व सगळा गाव हळहळ व्यक्त करायचा. परंतु आजकाल मृत व्यक्तीच्या मातीला त्याच्या घरातील वा भावकीतील सदस्य येत नाहीत तर परक्या माणसांची अपेक्षा काय ठेवायची? एवढी अमानुषता आजकालच्या माणसांमध्ये निर्माण झाली आहे. रोड प्रवासात एखाद्या वाटसरूचा अपघात झाला तर बघ्याची भूमिका घेणारे भरपूर लोक असतात पण त्यांना तात्काळ गाडीत टाकून दवाखान्यात दाखल करायला कोणी पुढे जात नाही. हीच खरी शोकांतिका आहे. एकेकाळी आयाबायांचा, मुलींचा व स्त्रियांचा आदर करणारे व त्यांना आईची व बहिणीची उपमा देणारे आजकाल त्यांच्याकडे वासनांध नजरेने बघतात. अगदी चिमुरड्या मुलींपासून ते वृद्ध महिलांपर्यंत बलात्काराचे व अत्याचाराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. अगदी अल्पवयीन मुलीवर सुद्धा सामूहिक बलात्कार केला जात आहे. माझ्या लहानपणी घरोघरी सख्ख्या भावंडांमध्ये इतके प्रेम व माया होती की, ते एकमेकांवर जीव ओवाळून टाकायला सुध्दा तयार व्हायचे. कारण तेव्हा एकत्र कुटुंब पद्धत अस्तित्वात होती. तेव्हाच्या स्त्रिया व महिला सुसंस्कारी व चारित्र्यवान होत्या. सासू-सासऱ्याची व घरातील सदस्यांची जीवापाड काळजी घ्यायच्या. परंतु काळाच्या प्रवाहासोबत माणसे बदलत गेली, माणसांची नीतिमत्ता कलुषित झाली, माणसे स्वार्थी व मतलबी झाली. माणसांमध्ये असणारे प्रेम, माया व ममता लोप पावून माणूस निर्दयी व स्वतःचा विचार करणारा स्वार्थी प्राणी झाला. आणि म्हणूनच जिकडे तिकडे अमानुषता पाहायला मिळत आहे. माणसातील माणुसकी लोप होण्याचे कारण म्हणजे आजकाल माणसांवर व लहान मुलांवर संस्काराचा अभाव आणि आजकालच्या मुलांवर संस्काराची पेरणी करणारे आजी आजोबा आता राहिले नाहीत. आजकालच्या नवविवाहित स्त्रिया टीव्ही व मोबाईलवर मालिका, चित्रपट आणि गाणी बघून त्यांच्या मनावर या माध्यमांचा परिणाम होत आहे. मालिकांमध्ये व चित्रपटांमध्ये संस्कार कुठेच दाखवले जात नाहीत आणि आमच्या महिला सुद्धा ती मालिका व चित्रपट बघून त्याचे अनुकरण करतात. त्यांच्यावर चांगले संस्कार न होता वाईट संस्कार होतात. आणि संस्कारातूनच माणुसकी व मानवता माणसात निर्माण होत असते. आजघडीला जर पाहिले तर आपल्याला कुठेच माणुसकी पाहायला मिळत नाही. माणुसकीचे व संस्काराचे धडे देणारे आजी आजोबा नामशेष झाले आहेत. नव्या पिढीला संस्काराचे व माणुसकीचे जराही नॉलेज नाही. माणसातली माणुसकी लोप होण्यामागे एवढेच कारण आहे की, टीव्ही बघणे, मोबाईल बघणे आणि त्यात असंस्कारी मालिका व चित्रपट बघणे हेच माणसातील माणुसकी लोप होण्याचे कारण आहे...माणसा माणसात पूर्वीसारखी मानवता रुजवायची असेल तर गरज आहे ती प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासाबरोबरच संस्काराची शिदोरी देणे, प्रत्येक महिलांना संस्काराचे व माणुसकीचे महत्त्व सांगणे म्हणजे आपोआप माणसातील माणुसकी वाढीस लागून प्रत्येकात माणुसकीचे प्रदर्शन दिसायला लागेल....फक्त गरज आहे ती संस्काराचे व माणुसकीचे महत्त्व मनात रुजवून लहान मुलांवर संस्काराची छाप पाडण्याची.

**-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## पान १ वरुन

### केंद्र सरकारने ...

होईल, त्यातून विक्री वाढण्याची शक्यता असल्याचे मत भास्करराव दानवे यांनी या पत्रकार परिषदमध्ये व्यक्त केले.

या पत्रकार परीषदेला भाजपा जिल्हा सरचिटणीस अनिलराव कोलते, गोविंद ढेंबरे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ.संध्याताई देठे, भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुख बाबासाहेब कोलते, महानगर सरचिटणीस सुनिल पवार, धनराज काबलिये, बबनराव सिरसाठ,अर्जुन गेही, संजय आटोळे आदीची प्रमुख उपस्थिती होती.

### जिल्ह्यातील विकासाची ...

सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मध्यान्ह भोजन योजना, संजय गांधी निराधार योजना, डिजीटल भारत, सर्व शिक्षा अभियान, जल जीवन मिशन, उमेद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, महावितरण, स्वामित्व हक्क, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध लाभाच्या योजना आदी योजनांचाही यावेळी आढावा घेतला. जालना महानगर पालिकेच्या हद्दीतील प्रॉपर्टी कार्डच्या कामासह इतर कामांबाबतही दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ काळे यांनी विविध सुचना केल्या.

केंद्रीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी दिशा समिती काम करत असते. यात एकूण २२ विषय समाविष्ट आहेत. केंद्राच्या विविध योजना तालुकास्तरावर प्रलंबित न ठेवणे तसेच विकास कामात दिरंगाई झाल्यास तपासणी करणे आदी कामे दिशा समितीकडून करण्यात येत असते. तसेच जिल्ह्यातील बेघर असणाऱ्या गरजु लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ प्राधान्याने देण्यात येईल. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेतील कामे, लाभार्थ्यांची संख्या जाणून घेत उपस्थित लोकप्रतिनिधी व सदस्यांनी विविध सूचना केल्या. यावेळी बैठकीला संबंधित उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास योजनेचे अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# पंडित तडेगावकर यांच्या वडिलांचे निधन

**भोकरदन -** तडेगाव ता. भोकरदन येथील शेषराव देशमुख तडेगावकर ( ८९) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दुपारी पूर्णा नदीकाठी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय रेल्वेमंत्री मा. रावसाहेब दानवे, दशेश्वर शिवालय संस्थान दहेगाव (ने) चे प्रमुख हभप सुदाम महाराज आदमाने ,संगमेश्वर संस्थान मूळचे हभप प्रल्हाद महाराज कड, जिप सदस्य डॉ.चंद्रकांत साबळे,विविध गावचे सरपंच,वारकरी संप्रदायाचे भक्तगण, शिक्षण व सर्व क्षेत्रातील व नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



झालेल्या शोकसभेत त्यांच्या जीवन चरित्रातील विविध आठवणी यावेळी व्यक्त केल्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार असून मराठवाडा साहित्य परिषद जालना चे सचिव पंडितराव तडेगावकर यांचे ते वडील तर मसापच्या केंद्रीय संचालिका डॉ. संजीवनी तडेगावकर यांचे ते सासरे होते.

# राष्ट्रीय लोक अदालतीत अनेक प्रकरणे निकाली; पक्षकारांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य

**अंबड । प्रतिनिधी -** राज्यात शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीला मोठे यश मिळाले आहे. दिवसभरात अनेक प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने आणि तडजोडीने निकाली काढण्यात आली. या उपक्रमामुळे न्यायालयावरील ताण कमी होण्यास मदत झाली असून, अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दोन्ही बाजूंच्या पक्षकारांनी समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने राज्यातील सर्व जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये या लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, कौटुंबिक वाद, धनादेश न वटल्याची प्रकरणे, बँकेची कर्ज वसुली आणि वीज बिलांशी संबंधित हजारो प्रकरणे ठेवण्यात आली होती. सकाळपासूनच न्यायालयामध्ये पक्षकार आणि वकिलांची गर्दी दिसून येत होती. एकंदरीत, या राष्ट्रीय लोक अदालतीने हजारो लोकांना जलद आणि सुलभ न्याय मिळवून दिला असून, 'न्याय आपल्या दारी' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.लोकअदालतीसाठी अंबड न्यायालयात एकूण ५ पॅनलची निर्मिती करण्यात आली होती.१) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या. श्री.गायधने साहेब जिल्हा न्यायाधीश तथा अति सत्र न्यायाधीश, अंबड सदस्य म्हणून ड.धबडकर २) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या श्री व्हि सी गवई दिवाणी न्या व स्तर.अंबड सदस्य म्हणून ड.गिरी ३) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या.श्रीमती.एस.एस जैन मॅडम,दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क स्वर, अंबड पॅनेल सदस्य म्हणून ड, एम जी.खेडकर ४) पॅनल न्या.श्रीमती.एस एच.राठी.याचसाहेब,तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबड,सदस्य म्हणून ड. आर डी पावसे ५) पॅनेलप्रमुख म्हणून कार्यरत न्या. श्रीमती एस.एस परिहार मॅडम, पॅनेल सदस्य म्हणून ड. के एस साबळे, यांच्या सह न्यायालयातील सर्व कर्मचारी,वकिलांनी व पोलीस प्रशासनाने आणि तालुका विधि सेवा प्राधिकरण सदस्यांनी कामकाज पाहिले. लोक अदालतीस पक्षकारांनी प्रतिसाद दिल्याने दिवाणी दावे व फौजदारी ,एकूण सर्व प्रकरणे १०१५ पैकी ४७ निकाली निघाली व त्यांची रक्कम १३४०६५०८, दाखल पूर्वक प्रकरणे २३१२ पैकी



१९ निकाली काढले,दावा दाखल पूर्व प्रकरनाची वसुली २२0000 -वसुली करून प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे. ऐकून वसूल १५६0६५0८ जमा करण्यात आले आहे.यासाठी अंबड वकील संघातील सर्व विधिज्ञ यांचे मोलाचे सहकार्य तसेच कोर्ट कर्मचाऱ्यांचे मोलांचे योगदान लाभले आहे.
राष्ट्रीय लोकअदालतसाठी विधिज्ञ वकील संघ अध्यक्ष ड.केदार कुलकर्णी ,श्री.सचिन व्ही मुंडलिक, श्री.बी एफ सिद्दीकी, श्री.डी इ गावडे, श्री लक्ष्मण गायके,श्री.ए एम म्हस्के, ड.नितीन खरात , ड . सलीम शेख,श्री. साबळे, ड शिरीन सय्यद , प्रज्ञा बागुल, पत्रकार नाजीम सय्यद, पोउपनि नरवडे, सहपोउपनि नागवे व इतर यांनी सहकार्य केले,सदरील लोकअदालतसाठी अंबड तालुक्यातील विविध बँक , इडछड कार्यालय, महावितरण विधुत,इतर बँकेतील कर्मचारी तसेच दिवाणी व फौजदारी प्रकरणातील पक्षकार व कर्मचारी वर्ग यांनी मोठ्या संख्येने उत्कृष्ट प्रतिसाद दिला.

**जलद आणि सुलभ न्यायप्रणालीचा अनुभव**

लोक अदालतीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कोणताही पक्षकार जिंकत किंवा हरत नाही, तर दोन्ही पक्षांना मान्य होईल असा तोडगा काढला जातो. यामुळे दोन्ही बाजूंचे समाधान होते आणि कटुता टाळली जाते. अनेक वर्षांपासून सुरू असलेले वाद काही तासांतच मिटल्याने पक्षकारांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव स्पष्ट दिसत होते. आमचा कौटुंबिक वाद गेल्या तीन वर्षांपासून न्यायालयात प्रलंबित होता. आज लोक अदालतीमुळे तो अर्ध्या तासात मिटला. आम्ही न्यायालयाचे आभारी आहोत, अशी प्रतिक्रिया एका पक्षकाराने दिली.

**वाहतूक ई-चलनांच्या प्रकरणांचा विक्रमी निपटारा**

या लोक अदालतीमध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रलंबित असलेल्या ई-चलनांच्या प्रकरणांचा मोठ्या प्रमाणात निपटारा करण्यात आला. अनेक वाहनचालकांनी तडजोडीअंती दंड भरून आपली प्रकरणे निकाली काढली. यामुळे शासनाच्या महसुलातही मोठी भर पडली आहे.

**न्यायालयावरील ताण होणार कमी**

लोक अदालतीच्या या यशस्वी आयोजनामुळे प्रलंबित खटल्यांची संख्या कमी होण्यास निश्चितच मदत होईल. लोक अदालत हे न्याय मिळवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. यामुळे केवळ वेळेची आणि पैशाची बचत होत नाही, तर समाजात सलोखा निर्माण होण्यासही मदत होते, असे मत एका ज्येष्ठ वकिलाने व्यक्त केले.





**जालना जालना शहरातील मूर्ती वेस जवळ शहराला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे.**
**(छाया /जावेद तांबोली)**

# जालना महानगरपालिकेकडून ३७२ नळ कनेक्शनचे नियमितीकरण

## २७.१५ लाख रुपयांची वसुली

**जालना । प्रतिनिधी** - महानगरपालिकेने १३ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये ३७२ अनधिकृत नळ कनेक्शनचे नियमितीकरण केले आहे. या मोहिमेतून महानगरपालिकेने एकूण २७,१५,६०० रुपये इतक्या रकमेची वसुली केली.

जालना शहरातील अनेक नळ कनेक्शन अनधिकृत असल्यामुळे महानगरपालिकेने ही प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवली होती. या दरम्यान, ज्या नागरिकांनी आपली अनधिकृत नळ जोडणी अधिकृत केली नाही, त्यांना आता भविष्यात १० हजार रुपये दंड भरावा लागणार आहे.

जालना जिल्हा व सत्र न्यायालयात झालेल्या या लोक अदालतीचे उद्घाटन मा. पालक न्यायाधीश यांच्या हस्ते झाले. या वेळी महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक, जिल्हा व सत्र न्यायाधीश, आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे न्यायाधीश उपस्थित होते.

या यशस्वी मोहिमेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अंबड तालुक्यात घरकुल योजना अडचणीत

## अधिक गृहनिर्माण अभियंते नेमण्याची मागणी

**धाकलगांव । प्रतिनिधी -** केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी घरकुल योजना आणि राज्यातील इतर गृहनिर्माण योजनांचा लाभ ग्रामस्थांना मिळावा, असा मोठा उद्देश असला तरी, प्रत्यक्षात अनेक अडचणींमुळे योजना पूर्णत्वाला येत नाहीत. अंबड तालुक्यात तब्बल २५ हजाराहून अधिक घरकुल योजना मंजूर असूनही, फक्त चार ग्रामिण गृहनिर्माण अभियंते कार्यरत आहेत. त्यामुळे कामाची गती मंदावली असून अनेक लाभार्थ्यांचे घरकुल अपूर्ण राहिले आहे.



शासकीय अनुदानाचे हप्ते वेळेवर न मिळाल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना घरकाम पूर्ण करण्यासाठी स्वखर्चाने अथवा सावकारांकडून कर्ज घेऊन काम करावे लागले आहे.

अंबड पंचायत समिती प्रशासनाने अनेकदा जिल्हा परिषदेकडे या समस्यांचे निराकरण करण्यासाठी मंडणी केली तरीही कोणतेही ठोस उपाय झालेला नाही, अशी गंभीर भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आर. व्ही. छल्लारे यांनी जालना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ई-मेलद्वारे निवेदन दिले आहे. त्यांनी अधिक ग्रामिण गृहनिर्माण अभियंते लवकरात लवकर नेमण्याची मागणी केली आहे, जेणेकरून मंजूर झालेल्या घरकुल योजनांचा कार्यान्वयन योग्य वेगाने होऊन ग्रामस्थांचे घर स्वप्न पूर्ण होईल.

प्रशासनाकडे या मुद्यावर तातडीने कार्यवाही करून समस्या दूर करव्यात अशी मागणी केली आहे.

त्यामुळे सरकारच्या योजना ठप्प होण्यापासून वाचतील व ग्रामीण भागातील गरीब आपले स्वप्नातलं स्वतः चं घर बांधू शकेल.

# पुण्याची प्राची धबल देब केक आर्टद्वारे महाराष्ट्रीयन संस्कृतीचा प्रचार

**मुंबई -** केक आणि कन्फेक्शनरी उद्योगातील प्रतिभा आणि उत्कृष्टतेचा सन्मान करणाऱ्या द इंडियन केक अवॉर्ड्स (खउ) मध्ये आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेती केक कलाकार प्राची धबल देब प्रमुख न्यायाधीश आणि सल्लागार मंडळ सदस्य म्हणून उपस्थित होत्या.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक कथाकथनासह पाककला एकत्र करून प्राची धबल देब लाट निर्माण करत आहेत. राज्याच्या समृद्ध वारशाचे उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित, पुण्याच्या भव्य केक आर्टमधील ही अद्वितीय कलाकार अद्भुत आहे. तिच्या बारीक रचलेल्या केक डिझाइनद्वारे, ती केवळ बेकिंग आणि सजावटीमध्ये तिचे प्रभुत्व दाखवत नाही तर प्रादेशिक परंपरांनाही आदरांजली वाहते. ती महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जुळणारे आकार, रंग आणि कथांचे मिश्रण करते. मुंबईतील इंडियन केक अवॉर्ड्स (खउ-) मध्ये प्रमुख ज्युरी म्हणून प्राचीने केक आर्टचे माध्यम सतत उंचावले आहे. नवीन कलाकारांना मार्गदर्शन करणे असो, किंवा सर्जनशीलतेचे उच्च मानके स्थापित करणे आणि खाद्य कलेद्वारे सांस्कृतिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणे असो, तिने तिच्या प्रत्येक भूमिकेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. प्रत्येक निर्मितीद्वारे, ती अन्न, कला आणि वारसा कसे सुंदरपणे एकमेकांशी जोडले जाऊ शकते हे अधोरेखित करते - केक बनवण्याच्या माध्यमातून महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख जपण्यात आणि प्रोत्साहन देण्यात तिला एक प्रमुख भूमिका बनवते.

प्राची धबल देब रॉयल-आयसिंग आर्टमध्ये तज्ज्ञ आहेत आणि जगातील शीर्ष रॉयल-आयसिंग कलाकारांपैकी एक आहेत. त्या रॉयल आयसिंगच्या व्हेगन आवृत्तीच्या निर्मात्या देखील आहेत. तिला अनेक पुरस्कार आणि मान्यता मिळाली आहेत. ऑस्ट्रेलियातील आंतरराष्ट्रीय केक शोसाठी भारतीय राजदूत आणि मुख्य न्यायाधीश म्हणून ऑस्ट्रेलियन उच्चायुक्तालयाने तिला मान्यता दिली आहे. रॉयल आयसिंग आर्ट, २०२४ साठी लंडनमध्ये ब्रिटिश खासदार बॉब ब्लॅकमन यांनी सन्मानित केले.

रॉयल आयसिंग आर्टसाठी इंडिया वीक २०२४ दरम्यान ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि यूके संसदेत सन्मानित करण्यात आले. भारताचे केंद्रीय मंत्री (२०२२) आणि राज्यपाल (२०२१) यांनी तिला सन्मानित केले आहे.

प्राची धबल देब ही केक डेकोर इंडिया-रॉयल आयसिंग आर्टची संस्थापक आहे आणि तिने ६ फूट ४ इंच लांबीची आणि १०० किलोपेक्षा जास्त वजनाची सर्वात मोठी व्हेगन रॉयल आयसिंग हाताने बनवलेली रचना तयार करून जागतिक विक्रम केला आहे.

केक आर्टमधील सर्जनशीलता वेगळ्याच प्रकारची आहे आणि महाराष्ट्रातील पुणे येथील प्राची धबल देब यांची हीच उत्कृष्ट कहाणी आहे. ती कला आणि पाईपिंग कौशल्याची जाणकार आहे आणि केक आणि आयसिंग स्ट्रक्चर्स तयार करण्यात तिला कौशल्य आहे. वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडनला तिच्या आवडीचा, समर्पणाचा आणि तपशीलांसाठी उत्सुकतेचा अभिमान आहे आणि त्यांनी तिला त्यांच्या गोल्ड एडिशन-२०२२ मध्ये समाविष्ट केले आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की रॉयल-आयसिंग हे काम करण्यासाठी एक कठीण माध्यम आहे आणि ते खूप नाजूक आहे. या नाजूक कलेसाठी खूप




संयम आणि कौशल्य आवश्यक आहे आणि जगभरात तिला खूप मर्यादित व्यावसायिक यश मिळाले आहे. प्राची जगभरातील विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय केक बनवण्याच्या स्पर्धांच्या ज्युरी सदस्यांमध्ये देखील सामील होते.

# आश्वासनांच्या ढिगाऱ्याखाली राज्यातील अन्नदाता

## महायुती सरकार पण निष्फळ ठरतंय

महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हा विषय दशकानुदशके चालत आलेला आहे. विदर्भआणि मराठवाडा हे दोन भाग तर आत्महत्यांची केंद्र बनली आहेत. येथे शेतकरी एका हंगामाच्या पिकावर जगतो, ते पीक जर नासले तर त्याचे जीवन उद्ध्वस्त होते. सध्या महायुती सरकारच्या काळात ही शोकांतिका अधिक तीव्र होत चालली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नुकतीच समाजमाध्यमांवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफीचे गोडवे गायले, त्यांच्या भोळ्या भाबड्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि निवडणुकीत मते मिळवली, पण प्रत्यक्ष सत्तेत आल्यावर हे वचन पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. याचा थेट परिणाम म्हणजे केवळ आठ महिन्यांत तब्बल १ हजार १८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात पश्चिम विदर्भातील ७०७ आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील ५२० शेतकरी आहेत. वडेट्टीवार यांच्या दाव्याचा विचार करता, महाराष्ट्रात दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करतात.

शेतकरी आत्महत्यांच्या मागील मूळ कारणे अनेक आहेत. शेती हा व्यवसाय आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणात पडला तर शेतकऱ्याला थोडा दिलासा मिळतो, पण पावसाचा नादुरुस्त पॅटर्न शेतकऱ्याचे जीवन उद्ध्वस्त करतो. एका बाजूला अतिवृष्टी तर दुसऱ्या बाजूला पावसाची टंचाई, गारपीट, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचा शेतकऱ्याला सामना करावा लागतो. यामुळे पिकांचे नुकसान होते आणि उत्पन्नावर पाणी फिरते. याच वेळी उत्पादन खर्च वाढतो. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी या सर्व गोष्टींच्या किमती सातत्याने वाढत आहेत. पण बाजारात मिळणारा भाव तसाच स्थिर किंवा अनेकदा किमान हमीभावापेक्षा कमी असतो. अशा परिस्थितीत शेतकरी कर्ज घेतो, तेही अनेकदा बँक आणि खासगी सावकार या दोन्हीकडून. बँकांचे कर्ज न मिळाल्यास सावकारांच्या दरवाजावर धाव घ्यावी लागते आणि तेथे व्याजाचा दर इतका जास्त असतो




की कर्जाचा डोंगर वाढत जातो. या सगळ्या आर्थिक घुसमटीबरोबर सामाजिक दबावही शेतकऱ्याला पेलावा लागतो. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, विवाह, वैद्यकीय खर्च हे सर्व हातातल्या पैशाशिवाय भागवणे अशक्य होते. गावोगावी प्रतिष्ठेचे राजकारण आहे. शेतकरी आपल्या मुलांना, पत्नीला, घराला जगवण्यासाठी कर्ज घेतो, पण पिके निघाली नाहीत की तो समाजात तोंड दाखवण्यासही लाजतो. अशा परिस्थितीत आत्महत्या हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. राजकारण या शोकांतिकेत महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणुकीत प्रत्येक पक्ष शेतकऱ्यांचे गोडवे गातो. महायुती सरकारनेही त्याला अपवाद केला नाही. त्यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले.

शेतकऱ्यांनी या वचनावर विश्वास ठेवला आणि मोठ्या संख्येने महायुतीला मते दिली. परंतु सत्तेत सत्तेत आल्यावर महायुतीने तोंड फिरवले. शासनाच्या मते, संपूर्ण कर्जमाफी देणे शक्य नाही, फक्त अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली, ज्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ही भूमिका म्हणजे सरळसरळ फसवणूक आहे. शेतकरी या आश्वासनाच्या भरवशावर बँकेकडे कर्जाची परतफेड पुढे ढकलत होते. आता जेव्हा सरकारने कर्जमाफी नाकारली, तेव्हा त्यांच्यावर परतफेडीचा डोंगर कोसळला. बँका आणि सावकारांच्या दडपणाखाली ते आत्महत्या करत आहेत. महायुती सरकारने दिलेली इतर आश्वासनेही तशीच धूळ खात पडली आहेत. मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तात्काळ मदत मिळेल असे सांगितले गेले, पण प्रत्यक्षात मदत मिळण्याआधी कुटुंबांना शेकडो कागदपत्रे जमा करावी लागतात. पात्रता निकष इतके कठोर ठेवले आहेत की अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. 'लाडकी बहीण' योजनेतून महिलांना मासिक आर्थिक मदत मिळेल असे सांगण्यात आले होते, पण निधीअभावी त्यात अडथळे निर्माण झाले. सिंचन प्रकल्प राबवले जातील, पाण्याचे योग्य नियोजन होईल असेही आश्वासन दिले गेले होते, पण प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झाला नाही. शेतकऱ्यांची सर्वात मोठी मागणी असलेली किमान आधारभूत किंमतीवर कायदेशीर हमी याबाबतही कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. थोडक्यात, सरकारला शेतकऱ्यांच्या जीवनमरणाशी काहीही देणेघेणे नाही. निवडणुकीत मते मिळवून सत्ता मिळाल्यावर त्यांना शेतकऱ्यांच्या व्यथा विसरायला वेळ लागत नाही. आत्महत्यांचा आकडा हे सरकारच्या अपयशाचे मोठे प्रमाणपत्र आहे. आज शेतकऱ्यांसाठी मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे, समुपदेशन सुविधा, आधार गट यांची गरज आहे. परंतु याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी हा फक्त निवडणूक जिंकण्याचे साधन वाटतो. या सर्व परिस्थितीत उपाययोजना दोन प्रकारच्या असायला हव्यात. तात्काळ आणि दीर्घकालीन. तात्काळ उपाययोजनांत त्वरित कर्जमाफी, नुकसानभरपाई वेळेवर मिळणे, विमा दावे तातडीने मंजूर होणे, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबांना अडथळ्यांशिवाय मदत मिळणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन उपाययोजनांत सिंचन व्यवस्थेचा विकास, पावसावर अवलंबून असलेल्या भागांना स्थायी जलस्रोत उपलब्ध करून देणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अनुदान देणे, पिकांच्या किमतीत स्थिरता आणण्यासाठी किमान हमीभावावर काटेकोर अंमलबजावणी, शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा विचार करावा लागेल.

## पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान शेतकऱ्यांची प्रशासनाकडे मदतीची मागणी

**धाकलगांव । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यात गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून सुरू असलेल्या सलग पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सोयाबीन, कापूस, तुर, मोसंबी, डाळिंब, सिताफळ व भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे .



धाकलगांव परिसरात दि:१३ शनिवार दुपारी सुरू झालेला मुसळधार पाऊस रात्रभर सुरू राहिला. या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान जास्त झाले आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून चालू असलेला पाऊसाने नुकसान झालेल्या पिकांचे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंचनामे करून दखल घेतली नाही. तसेच राजकीय नेत्यांनेही परिसरात दाखल झालेले नाहीत .

शेतकरी यांनी स्थानिक प्रशासन आणि राजकीय नेत्यांकडे विनंती केले आहे की, आमचे संपूर्ण पिक नष्ट झाले आहे. आता तरी लवकरात लवकर पंचनामे करून योग्य ती मदत देण्यात यावी.शेतकऱ्यांची अपेक्षा आहे की प्रशासनाकडून तातडीने दखल घेतली जाईल व नुकसान भरपाईसाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरू होईल.

# स्व. किशोर अग्रवाल यांच्या स्मृत्यर्थ प्लास्टिक संकलनासाठी वाहन भेट

### रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या पर्यावरणपूरक उपक्रमाला बळ

**जालना । प्रतिनिधी -** पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीसाठी सदैव अग्रेसर असलेले युवा उद्योजक राहुल अग्रवाल यांनी वडील स्व. किशोरजी अग्रवाल यांच्या स्मृत्यर्थ रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या प्लास्टिक संकलन कार्यासाठी आधुनिक ई-वाहन भेट दिले. त्याचा लोकार्पण सोहळा १३ सप्टेंबर रोजी पार पडला.

प्रारंभी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी प्लास्टिक संकलन कार्याची माहिती देऊन, राहुल अग्रवाल यांनी एक वाहन उपलब्ध करून दिल्याने आमच्या प्लास्टिक संकलन व पर्यावरण संवर्धन कार्याला निश्चितच मोठे बळ प्राप्त झाल्याचे सांगून त्यांचे आभार व्यक्त केले. राहुल अग्रवाल म्हणाले की, रोटरी क्लब च्या माध्यमातून प्लास्टिक संकलन आणि पर्यावरण संवर्धनाचे मोठ्या प्रमाणात कार्य होत असून, त्यास हातभार लागावा, हा उद्देश समोर ठेवून उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या या नव्या वाहनामुळे प्लास्टिक संकलन कार्यास गती मिळेल. जालना शहरात प्लास्टिक संकलन आणि पुनर्वापराला चालना मिळून पर्यावरण संवर्धनाचा प्रभाव वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी स्व. किशोर अग्रवाल यांच्या समाजसेवी कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली अर्पण केली. डॉ. राजेश सेठिया यांनी राहुल अग्रवाल यांनी पर्यावरण क्षेत्रासाठी केलेल्या योगदानाची माहिती दिली.

कार्यक्रमाला सृष्टी फाउंडेशनच्या माजी अध्यक्ष संध्या जहागीरदार, सचिव जयश्री कुंजगे, डॉ. नितीन खंडेलवाल, विवेक मणियार, जयेश पहाडे, डॉ. सुमित्रा गादिया, सौ. स्मिता भक्कड, सुयोग सावजी, जगदीश समदानी, अभय मेहता, संजय राठी, कैलाश बियाणी, संजय दाड, प्रदीप मुथा, अशोक शर्मा, प्रदीप तोतला, विनोद पाटणी यांच्यासह राहुल अग्रवाल यांचा मित्रपरिवार, अद्विक क्लबचे सदस्य तसेच रोटरी क्लबचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार पंकज लड्डा यांनी मानले.

**झाडे लावा**
**झाडे जगवा**

## जालना येथे उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि. १९ सप्टेंबर २०२५ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वत:चा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगा बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅप्रीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी ,मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.१९ सप्टेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन के डी दांडगे मिटकॉन जालना यांनी केले आहे.

## हिंदी दिवसानिमित्त दुर्गामाता विद्यालयात निबंध स्पर्धा आयोजित

**भोकरदन । प्रतिनिधी -** तालुक्यातील दुर्गामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सोयगांव देवी येथे हिंदी दिवस निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, माय भारत जालना यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

माय युवा भारत, जालना यांच्या व दुर्गामाता विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य देविदास पा. बोर्डे होते, तर प्रमुख पाहुणे प्रताप जंजाळ व गणेश टेकाळे उपस्थित होते. प्रस्ताविक नितिन राठोड यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन इंगळे यांनी केले आणि आभार प्रदर्शन गणेश सुरासे यांनी केले. कार्यक्रमादरम्यान प्राचार्य देविदास बोर्डे यांनी हिंदी भाषेचे महत्त्व पटवून सखोल माहिती दिली. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणार्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र वितरण केले गेले. तसेच, हिंदी विभागाचे नितिन राठोड आणि यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.




हिंदी दिवस दरवर्षी १४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. १४ सप्टेंबर १९४९ रोजी घटनेच्या समितीने हिंदी भाषेला भारतीय संघराज्याची राजभाषा म्हणून मान्यता दिली होती. कार्यक्रमात कर्मचारी गणेश थोरात, दिनकर सुरडकर, अनिल कोरडे, कैलास दळवी, संदीप जाधव, संदीप तेलंग्रे, श्रीमती सुजाता तायडे, श्रीमती उज्वला सपकाळ, संतोष सहाणे, दीपक दांडगे, करण दांडगे, योगेश गिरी, गणेश सुरडकर तसेच अनेक विद्यार्थी उपस्थित होते व स्पर्धेत सहभागी झाले.

दीपरत्न रेमेडी




- वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
- वेब पोर्टल, युट्युब चॅनल
- वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
- नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
- वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय

वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन

9975387225 8390098886

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.